CR1979082901

निवृत्ती वेतन निश्चित करण्यासाठी
सुधारित सूत्र लागू करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग
शासन निर्णय क्रमांक पी ई एन १०७९/सी आर ९२६/७९/एसईआर-४
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२ दिनांक २९ ऑगस्ट १९७९

**शासन निर्णय**

सध्या, मुंबई मुलकी सेवा नियम खंड २ यातील परिशिष्ट १४ 'क' मधील सुधारित निवृत्ती वेतन नियमावली १९५० च्या तरतुदी व त्यामध्ये वेळोवेळी केलेल्या सुधारणा यांच्या अनुसार निवृत्ती वेतनाची रक्कम प्रत्येक पूर्ण सहामाही अर्हताकारी सेवेच्या कालावधीस निवृत्ती वेतनार्ह वेतनाच्या १/१६० - या दराने नियमित केली जाते, याप्रमाणे निवृत्ती वेतनाची रक्कम निश्चित करतांना अर्हताकारी सेवेचे जास्तीत जास्त ६६ पूर्ण सहामाही कालावधी लक्षात घेतले जातात. आणि निवृत्ती वेतनाची मासिक रक्कम रुपये १,००० पर्यन्त मर्यादित केली जाते. शासन आता असा आदेश देत आहे की, जे राज्य शासकीय कर्मचारी दिनांक ३१।३।१९७९ रोजी शासकीय सेवेत होते व त्याच दिवशी अथवा त्यानंतर सेवानिवृत्त झाले किंवा यापुढे होतील त्यांच्या निवृत्ती वेतनाची रक्कम खाली दर्शविलेल्या सूत्रानुसार निश्चित करावी.

| | निवृत्ती वेतनाची रक्कम |
|---|---|
| अ) पहिल्या रू. १,००० निवृत्ती वेतनार्ह वेतनावर | निवृत्ती वेतनार्ह वेतनाच्या ५० टक्के |
| ब) पुढील रू. ५०० निवृत्ती वेतनार्ह वेतनावर | निवृत्ती वेतनार्ह वेतनाच्या ४५ टक्के |
| क) उरलेल्या निवृत्ती वेतनार्ह वेतनावर | निवृत्ती वेतनार्ह वेतनाच्या ४० टक्के (मात्र एकूण कमाल मर्यादा खालील परिच्छेद ३ प्रमाणे राहील.) |

२. वरील सूत्राप्रमाणे निश्चित करण्यांत येणारी निवृत्ती वेतनाची रक्कम ३३ वर्षांच्या (म्हणजे ६६ पूर्ण सहामाही कालावधीच्या) कमाल अर्हताकारी सेवेशी निगडीत राहील, सेवा निवृत्तीच्या वेळी ज्या सरकारी कर्मचाऱ्यांची अर्हताकारी सेवा १० वर्ष किंवा अधिक पण ३३ वर्षांहून कमी झाली असेल, त्यांच्या बाबतीत त्यांच्या निवृत्ती वेतनाची रक्कम त्यांनी केलेल्या अर्हताकारी सेवेचे ३३ वर्षांच्या कमाल अर्हताकारी सेवेशी जे प्रमाण असेल, तेवढयाच प्रमाणातील कमाल अनुज्ञेय निवृत्ती वेतनाइतकी असेल. या निर्णयासोबत जोडलेल्या परिशिष्टांत नमुन्यादाखल काही उदाहरणे सोडवून दाखविली आहेत.

३. वरील सूत्राप्रमाणे निश्चित करण्यांत येणारी निवृत्ती वेतनाची रक्कम आणि दि. १।१२।७८ रोजी निवृत्ती वेतनावर अनुज्ञेय असलेली तात्पुरती वाढ मिळून निवृत्ती वेतनाची कमाल मासिक मर्यादा रु. १,५००/- राहील. वरील सूत्राप्रमाणे अनुज्ञेय असलेल्या मुळ निवृत्ती वेतनाची रक्कम रू. १,५००/- पेक्षा जास्त असेल तर, दिनांक १।१२।१९७८ रोजी अनुज्ञेय असलेली निवृत्ती वेतनावरील तात्पुरती वाढ मिळणार नाही.

४. सेवा उपदान, मृत्यू-नि-सेवा निवृत्ती उपदान, कुटुंब वेतन यांच्या अनुज्ञेयते संबंधीच्या तसेच निवृत्ती वेतनार्ह वेतन, अर्हताकारी सेवा व अशा सेवेचे पूर्ण सहामाही कालावधी,

........२/-

रुपयापेक्षा कमी असणाऱ्या रकमेचे निकट उच्चतम पूर्ण रुपयांत रुपांतर या संबंधीच्या मुंबई मुलकी सेवा नियमावलीमधील सध्याच्या तरतुदी आहेत तशाच राहतील.

५. सुधारित निवृत्ती वेतन नियमावली, १९५० च्या तरतुदी या शासन निर्णयाच्या तरतुदींच्या व्याप्तीपर्यन्त शिथिल करण्यांत आल्या आहेत असे समजावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

वृ. प्रभाकर,
सचिव,
वित्त विभाग.

प्रति,
मंत्रालयाच्या निरनिराळ्या विभागाच्या अधीन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयांचे प्रमुख,

०००००००००००

क्रमांक लेखा-२३६/सी आर १४९८/अ-3/७९ पुणे दि. २७ । ९ ।१९७९

प्रत :- उपसंचालक, भूमि अभिलेख पुणे, मुंबई, नागपूर, औरंगाबाद यांच्या माहितीसाठी व मार्गदर्शनासाठी प्रत पाठविण्यांत आली आहे.

(सही) २०।१०

कार्यासन अधिकारी अ-१
जमाबंदी आयुक्त आणि संचालक,
(स.मु.) भूमि अभिलेख म. राज्य पुणे यांचे कार्यालय.

प्रत :- सर्व कार्यालय प्रमुखांना माहितीसाठी रवाना.
प्रत :- सर्व कार्यासन अधिकारी, जमाबंदी आयुक्त पुणे यांचे कार्यालय
प्रत :- हँड फाईल अ. १ / [illegible] .(लेखा-५)२

मी/२६-९.

०००००००००००

परिशिष्ट

शासन निर्णय वित्त विभाग क्र. पोईएन १०७९/सी आर १२६५/७९/एस ई आर ४, दि. २१.१०.१९७९ मधील सुधारित सुत्रानुसार देणदेयच्या [illegible] स्तरातील शासकीय कर्मचाऱ्यांची गणण्यात आलेले निवृत्ती वेतन.

| निवृत्ती वेतनार्ह वेतन | अर्हताकारी सेवेच्या ६६ पूर्ण सहामाही कालावधीवर मिळणारे निवृत्ती वेतन | अर्हताकारी सेवेच्या ६० पूर्ण सहामाही कालावधीवर मिळणारे निवृत्तीवेतन | अर्हताकारी सेवेच्या ६१ पूर्ण सहामाही कालावधीवर मिळणारे निवृत्ती वेतन | अर्हताकारी सेवेच्या ४० पूर्ण सहामाहीकालावधीवर मिळणारे निवृत्ती वेतन. | अर्हताकारी सेवेच्या ४१ पूर्ण सहामाही कालावधीवर मिळणारे नि. वेतन |
|---|---|---|---|---|---|
| रु. १००० | निवृत्ती वेतन रु. ५०० | रु. ५००×६०/६६ = रु.४५४.५० किंवा रु.४५५ | रु. ५००×६१/६६ = ४६२.१२ किंवा रु.४६३ | रु. ५००×४०/६६ = रु. ३०३.०३ किंवा रु. ३०४ | रु. ५००×४१/६६ = रु.३१०.६० किंवा रु.३११ |
| रु. १३०० | पहिले रु. १००० ५०% = रु.५००<br>पुढील रु. ३०० ४५% = रु.१३५<br>एकूण रु. ६३५ | रु. ६३५×६०/६६ = रु. ५७७.२७ किंवा रु. ५७८ | रु. ६३५×६१/६६ = रु.५८६.८९ किंवा रु.५८७ | रु. ६३५×४०/६६ = रु. ३८४.८४ ~~६६~~ किंवा रु. ३८५ | रु. ६३५×४१/६६ = रु. ३९४.४६ किंवा रु.३९५ |
| रु. १५०० | पहिले रु. १००० ५०% = रु.५००<br>पुढील रु. ५०० ४५% = रु. २२५<br>एकूण रु. ७२५ | रु. ७२५×६०/६६ = रु. ६५९.०९ किंवा रु. ६६० | रु. ७२५×६१/६६ = रु.६७०.०७ किंवा रु.६७१ | रु. ७२५×४०/६६ = रु. ४३९.३९ किंवा रु.४४० | रु. ७२५×४१/६६ = ४५०.३७ किंवा रु.४५१ |
| रु. २००० | पहिले रु. १००० ५०% = रु. ५००<br>पुढील रु. ५०० ४५% = रु. २२५<br>उरलेले रु. ५०० ४०% = रु. २००<br>एकूण रु. ९२५ | रु. ९२५×६०/६६ = रु. ८४०.९० किंवा रु.८४१ | रु. ९२५×६१/६६ = रु. ८५४.९२ किंवा रु. ८५५ | रु. ९२५×४०/६६ = रु. ५६०.६० किंवा रु. ५६१ | रु. ९२५×४१/६६ = रु ५७४.६२ किंवा रु.५७५ |
| रु. २५०० | पहिले रु. १००० ५०% = रु.५००<br>पुढील रु. ५०० ४५% = रु.२२५<br>उरलेले रु. १००० ४०% = रु.४००<br>एकूण रु. ११२५ | रु. ११२५×६०/६६ = रु. १०२२.७२ किंवा रु १०२३ | रु. ११२५×६१/६६ = रु. १०३९.७७ किंवा रु १०४० | रु. ११२५×४०/६६ = रु ६८१.८१ किंवा रु.६८२ | रु. ११२५×४१/६६ = रु ६९८.८४ किंवा रु ६९९ |
| रु. २७५० | पहिले रु. १००० ५०% = रु ५००<br>पुढील रु. ५०० ४५% = रु २२५<br>उरलेले रु. १२५० ४०% = रु ५००<br>एकूण रु १२२५ | रु. १२२५×६०/६६ = रु. १११३.६३ किंवा रु.१११४ | रु. १२२५×६१/६६ = रु. ११३२.११ किंवा रु.११३३ | रु. १२२५×४०/६६ = रु ७४२.४२ किंवा रु. ७४३ | रु. १२२५×४१/६६ = रु ७६०.९८ किंवा रु ७६१ |
| रु. ३५०० | पहिले रु. १००० ५०% ५००<br>पुढील रु. ५०० ४५% = २२५<br>उरलेले रु. २००० ४०% = ८००<br>एकूण रु. १५२५ (*) | रु. १५००×६०/६६ = १३६४ | रु. १५००×६१/६६ = रु १३८६.३६ किंवा रु.१३८७ | रु. १५००×४०/६६ = रु. ९१० | रु. १५००×४१/६६ = रु ९३१.८० किंवा रु ९३२ |

(*) कमाल मर्यादा रु. १५००/-